# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 12.05.2025** **वार- सोमवार**

---

**<u>दहावी निकाल</u>**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं यावर्षी फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात घेतलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल उद्या दिनांक 13 मे रोजी जाहीर होणार आहे. दुपारी एक वाजल्यापासून मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना हा निकाल पाहता येईल असं मंडळांनं कळवलं आहे.

**<u>सामंज स्यकरार</u>**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ; संगणक तंत्रज्ञान क्षेत्रातील आयबीएम ही कंपनी आणि यशस्वी स्किल्स लिमिटेड यांच्यात रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांच्या अंमलबजावणीसाठी नुकताच सामंजस्य करार झाला. या करारामुळे मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणाबरोबरच रोजगाराभिमुख संगणकीय शिक्षण मिळणार आहे. मुक्त विद्यापीठाच्या पदवी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल  इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, सायबर सिक्युरिटी, डेटा एनॅलिटीक्स अशा विविध आधुनिक तंत्रज्ञानासंदर्भात प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

**<u>बुद्धजयंती</u>**

तथागत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती म्हणजेच बुद्ध पौर्णिमेनिमित्त पुण्यातील बुद्धविहारांमध्ये आज विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. बुद्धविहारांमध्ये फुलांची सजावट करण्यात आली असून सकाळी धम्म पहाट कार्यक्रम पार पडला. आज संध्याकाळी रेल्वे स्थानकाजवळील बुद्ध विहारांमध्ये प्रवचन, बुद्ध वंदना होणार आहे. बुद्धांचा संदेश देत शांतता फेरीही काढण्यात येणार आहे.

**<u>इस्रो-नासा</u>**

ग्रामीण भागातील 75 विद्यार्थ्यांना 2025-26 या शैक्षणिक वर्षात इस्रो आणि नासा या अंतराळ संशोधन केंद्रांची भेट घडवण्याचं नियोजन पुणे जिल्हा परिषदेनं केलं आहे. यासाठी योग्य आणि जिज्ञासू विद्यार्थ्यांची निवड करण्याकरता पुणे जिल्ह्यातील प्राथमिक शाळांमधील इयत्ता सहावी आणि सातवीच्या इच्छुक विद्यार्थ्यांची सामान्य विज्ञान आणि गणिताची परीक्षा घेण्यात येणार आहे.

**<u>मिळकतकर</u>**

पुणे शहरात स्वमालकीच्या निवासी मिळकतीत राहाणाऱ्या नागरिकांनी पीटी थ्री अर्ज भरून दिल्यानंतरही ज्यांना मिळकत करात 40 टक्के सवलत मिळाली नाही, अशा नागरिकांनी नजीकच्या क्षेत्रीय कार्यालयात जाऊन खातरजमा करावी. पीटी थ्री अर्जाबरोबर आवश्यक कागदपत्र दिली नसल्यास त्याची पूर्तता करावी, असं आवाहन पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी केलं आहे.

**पुरस्कार**

कृ. ब. उर्फ अण्णा तळवलकर मेमोरियल ट्रस्टतर्फे दिला जाणारा यंदाचा समाजशिक्षक पुरस्कार, ज्येष्ठ मानसशास्त्रज्ञ डॉ. अनघा लवळेकर यांना, तर अनुकरणीय उद्योजक पुरस्कार मीनल मोहाडीकर यांना जाहीर झाला आहे. येत्या 18 मे रोजी निवृत्त लेफ्टनंट जनरल सुदर्शन हसबनीस यांच्या हस्ते या पुरस्कारांच वितरण होणार आहे.

**प्रकाशन**

साहित्याचा वेध घेणारी पुस्तकं आणि रसिकतेला दाद देणारी माणसं आपल्याभोवती आहेत, हे दिलासादायक आहे, असं प्रतिपादन कवी आणि अभिनेते किशोर कदम यांनी काल पुण्यात केलं. कार्लोस मारिया दोमिंगेज लिखित 'द हाऊस ऑफ पेपर' या अनुवादित पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. ज्येष्ठ नेते शरद पवार, लेखक नितीन रिंढे, समीक्षक गणेश विसपुते यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**मोहन जोशी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी स्थापन केलेल्या हरिजन सेवक संघाच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी माजी आमदार मोहन जोशी यांची पाच वर्षांकरिता नियुक्ती करण्यात आली आहे. संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शंकर कुमार संन्याल यांनी जोशी यांना नियुक्तीचं पत्र नुकतंच दिलं. हरिजन सेवक संघाच्या वतीने आदिवासी भागात वसतीगृह आणि शाळा चालवल्या जातात. तसंच ग्रामीण भागात गरीब विद्यार्थ्यांसाठी शाळा, अभ्यासिका चालवल्या जातात. राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या प्रचार, प्रसाराचं कार्य हरिजन सेवा संघातर्फे करण्यात येतं, त्याचा विस्तार आगामी काळात केला जाईल, असं मोहन जोशी यांनी निवडीनंतर सांगितलं.

**पिंपरी चिंचवड**

पिंपरी चिंचवड शहरात मोठ्या प्रमाणावर पाणी चोरी आणि पाणी गळती होत आहे, त्यामुळे शहराला पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यातच अनधिकृत नळजोडणी घेणाऱ्यांची संख्याही मोठी असल्याने महापालिकेने सर्वेक्षण मोहीम हातात घेतली आहे. त्यामध्ये जवळपास साडेनऊ हजार अनधिकृत नळ जोडणी आढळून आल्या. ही सर्वेक्षण मोहीम पुढची दोन वर्ष चालणार आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 36 पूर्णांक 2 दशांश अंश तर किमान तापमान 22 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सिअस होतं. संध्याकाळी पावसाच्या हलक्या सरी पडल्या. उद्या कमाल तापमानात आणखी घट अपेक्षित असून दुपारनंतर सोसाट्याच्या वाऱ्यांसह हलका पाऊस पडेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**